आदेश

जा.क्र. २१०५ /कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक - २७/०३/२०२०

**विषय :-फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दि.२३/०३/२०२० चे १८.०० ते दि.३१/०३/२०२० चे २४.०० वा. च्या मनाई आदेशाचा कालावधी वाढविणेबाबतचा आदेश.**

(२) ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पुणे शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, यांचेकडील जा क्र १९९८/कोरोना/मनाई/आदेश/२०२० दि.२२/०३/२०२० अन्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात आहे.

(३) कोरोना विषाणुंचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणुन केंद्र सरकारच्या निर्देशानुसार (संदर्भ- क्र गृहमंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील क्र.४०-३/२०२० DM-१ (A) अन्वये) संपुर्ण भारतात १४ एप्रिल २०२० पर्यत लॉकडाऊन करण्याची अधिसुचना दि.२५ मार्च २०२० पासुन केंद्र शासनामार्फत जारी करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१ मध्य उप-विभाग यांचे कडील अधिसुचना क्रमांक ३ मधील पान क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चा क्र.एमएससी-१२७४/व्ही-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ (II -1974) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

(५) त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी सायकल तसेच पारंपारिक व अपारंपारिक इंधनावर चालणा-या मोटार सायकल (गिअरसह/शिवाय), सर्व प्रकारच्या तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतुकीची वाहने यांचा प्रवास व वाहतुक यासाठी वापर करण्यास मनाई करणारा दि.२३/०३/२०२० चा आदेश **दि.२३/०३/२०२० चे १८.०० ते दि.३१/०३/२०२० चे २४.०० वा. पर्यत लागु करण्यात आला आहे. सदर आदेशास केंद्र शासनाच्या उपरोक्त आदेशान्वये मुदतवाढ देवुन तो दि.१४/०४/२०२० चे २४.०० वा. पर्यत** लागू करण्यात येत आहे.

(६) या आदेशाने खालील नुमद सेवा व सुविधा यांना अत्यावश्यक या सदराखाली समजले जावे.

अ. **अत्यावश्यक वस्तु**

- किराणा माल
- भाजीपाला , फळे
- दुध, दुग्धउत्त्पादन, अंडी, मटण, चिकन, मासे
- औषधे

ब. **अत्यावश्यक सुविधा**

- पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित
- वैदयकीय सेवा (डॉक्टर व पॅरामेडिकल स्टाफ), रुग्णवाहतुक

- सफाई कामगार
- बँक कर्मचारी
- सुरक्षा कर्मचारी
- वीज वितरण
- पाटबंधारे व पाणी पुरवठा
- शेत मालक / मजुर व शेतीकामाशी संबंधित
- उत्पादक (औषध, खादयपदार्थ, स्वच्छता, सुरक्षा इ. संबंधित प्रक्रिया व वितरण)
- दुरसंचार (दुरध्वनी व इंटरनेट)
- केबल ऑपरेटर
- ऑनलाईन घरपोच सेवा (अॅमेझॉन, फ्लिपकार्ट, स्वीगी, बिगबास्केट, झोमॅटो व इतर ऑनलाईन सेवा)
- सामाजिक हेतुने वृध्दाश्रम, निराधार, अपंग, जेष्ठ नागरिक, एकाकी व्यक्ती यांना संस्थेच्या माध्यमातुन पुरावल्या जाणा-या अत्यावशक, वैदयकीय व भोजन सेवा
- प्रसारमाध्यम व त्यांचे प्रतिनिधी
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्वाच्या पायाभूत विकासाशी संबंधित उद्योग - CNI
- पोलीस आयुक्त व जिल्हाधिकारी, पुणे कार्यालय यांनी परवानगी दिलेल्या व्यक्ती

**टिप** -

१. वर नमुद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांना त्यांचे निवासस्थान ते कार्यालय तसेच त्यांचे कर्तव्य बजावण्यासाठी आवश्यकतेनुसार शहरातील इतर मार्गावर वाहन वापरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांनी त्यांचे **ओळखपत्र, निवासस्थान व कार्यालय याबाबतचा पुरावा** सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

**२. पेट्रोलपंप चालकांनी वर नमुद अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्र व कार्यालय याबाबतचा पुरावा तपासुन त्यांच्या वाहनांना आवश्यकता असेल त्यावेळी इंधन पुरवठा करावा.**

३. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनाच्या अंमलबजावणीसाठी नेमणूक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

४. वरील संबंधित व्यवस्थापनांनी त्यांच्या एकुण कर्मचा-यांपैकी कर्तव्यार्थ कर्मचा-यांची संख्या नियंत्रित ठेवणे बंधनकारक आहे.

५. रुग्ण वाहतुकीवेळी रुग्णांनी संबंधित दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.

६. वरील सर्व नुमद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लागु राहणार नाही.

(७) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.२७/०३/२०२० रोजी दिलेला आहे.

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २७/०३/२०२०**